उप-विभागीय पोलीस अधिकारी लोहमार्ग पुणे

# प्रेस नोट

दिनांक १२/०९/२०२३ रोजी अल्पवयीन पिडीता व तिचा मित्र लिलाधर ठाकुर असे पुणे रेल्वे स्टेशन येथे उतरले असता सिध्दार्थ मल्टिपर्पज सोसायटी चे कर्मचारी नामे १) कमलेश रामग्रट तिवारी,२) करन किसन राठोड ३) सुस्मिता सुरेश कसबे ४) कुनाल प्रमदास राठोड ५) दुर्गेश सुभाष कोळी यांनी त्यांना सिध्दार्थ मल्टीपर्पज सोसायटी आरबी/१११/५६२/०१ ताडीवाला रोड, पुणे येथे घेवुन गेले. त्यानंतर त्या दोघांना जबरदस्ती डांबुन ठेवुन प्रधान आरक्षक अनिल केशव पवार नेमणूक रेल्वे सुरक्षा बल थाना पुणे याने आपल्या पदाचा गैरवापर करून सदर संस्थेचे कर्मचारी कमलेश रामप्रगट तिवारी याचे मदतीने त्यांचे कडे पैशांची मागणी करून ऑन लाईन ६०००/– रूपये घेतले, तसेच जबरदस्ती करून दिनांक १२/०९/२०२३ रोजी ते दिनांक १७/०९/२०२३ रोजी पर्यंत अनिल पवार व कमलेश तिवारी यांनी संगणमत करून जिवे ठार मारण्याची धमकी देवुन दोघांनीही पिडीतेवर वारंवार बलात्कार केला

वरील नमुद प्रकरणी पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नंबर ६९५/२०२३ कलम ३४२, ४५०, ३८४, ३७६, (२) (एन), (ड) ५०६, ३५४, ३४ भा.द वि. व ४,६,८ बालकांचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण कायदा व अनुसुचित जमाती ( अत्याचार प्रतिबंधक कायदा ) १८८९ मधील कलम ३ (१) (w) (i) (ii) ३ (२) (v) (va) व भ्रष्टाचार अधिनियम १९८८ चे कलम ७ व १३ प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयात यापुर्वी वरील नमुद अनुक्रम नंबर ०१ ते ०५ यांना अटक करण्यात आली असुन ते सध्या न्यायालयीन कोठडी मध्ये आहेत.

सदर गुन्हयात फरारी असलेला मुख्य आरोपी अनिल केशव पवार प्रधान आरक्षक नेमणूक रेल्वे सुरक्षा बल थाना पुणे यास दिनांक १२/१२/२०२३ रोजी दाखल गुन्हयात अटक करण्यात आली असुन त्यास मा न्यायालयाने दिनांक १८/१२/२०२३ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर केली आहे.

सदर गुन्हयाचा तपास करीत असताना यातील मुख्य आरोपी प्रधान आरक्षक अनिल केशव पवार व सिध्दार्थ मल्टीपर्पज सोसायटीचा कर्मचारी नामे कमलेश रामप्रगट तिवारी यांनी संस्थेत दाखल होणा–या दुस–या एका अल्पवयीन पडीतेस सी.डब्ल्यू.सी कडे न नेता दिनांक १०/०४/२०२३ ते दिनांक २४/०४/२०२३ रोजी पर्यंत संस्थ मध्ये पिडीतेस व तीचे सोबत असलेल्या जोडीदारास जबरदस्ती डांबवून ठेवून पिडीतेवर तिचे इच्छेविरुध्द तिला लज्जा उत्पन्न होईल असे गैर वर्तन करुन विनंयभंग केला असे चौकशी अहवालावरुन निष्पन्न झाल्याने पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नंबर ७९३/२०२३ कलम कलम ३५४ (अ) ३८४,३४२, ३४ भा.द.वि. तसेच बालाकांचे लैगीक अपराधा पासुन सरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ९ (अ) (१) तसेच अनुसुचित जाती आणि अनुसूचित जमाती ( अत्याचार प्रतिबंधक ) कलम ३ (१) (w) (i) (ii) ३ (२) (v) (va) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास महेश देवीकर उपविभागीय पोलीस अधिकारी लाहमार्ग विभाग पुणे हे करीत आहेत.

वरील नमुद गुन्हयाचा तपास तुषार दोशी पोलीस अधीक्षक लोहमार्ग पुणे, गणेश शिंदे अपर पोलीस अधीक्षक लोहमार्ग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली महेश देवीकर उपविभागीय पोलीस अधिकारी तथा तपास अधिकारी लोहमार्ग विभाग पुणे हे करीत आहेत.

## तपास पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार

१) महेश देवीकर उपविभागीय पोलीस अधिकारी तथा तपास अधिकारी लोहमार्ग विभाग पुणे

२) पोलीस निरीक्षक राजेंद्र गायकवाड, स्मिता वासनिक व स्टाफ, इरफान शेख, व स्टाफ, संतोष पैलकर व स्टाफ, दिपाली आढाव व स्टाफ, प्रमोद खोपीकर

३) सहा. पोलीस निरीक्षक छाया कांबळे, युवराज कलकुटगी, मिलींद झोडगे

४) पोलीस उप निरीक्षक अब्दुल पटेल, प्रेमानंद नाईक, गजानन पन्हाळकर

५) सहा.पोलीस.उप निरीक्षक अशोक गलगटे, देवेंद्र गोसावी

६) पो हवा अविनाश कांबळे, संजय लांडगे, उमेश कोंगे, प्रशांत डोइफोडे.

७) पो ना आशा वाघमारे, रेणुका पवार, मुसकान पटेल, निलीमा खेडकर, दिनेश केंद्रे

( महेश देवीकर )
उपविभागीय पोलीस अधिकारी
लोहमार्ग, पुणे विभाग, पुणे